विषयः- व्हिडिओ फिल्म चित्रपटांसहित कॉपीराईट
हस्तांतरणावरील विक्रीकराबाबत-
(मुंबई विक्रीकर कायदा, १९५९) मुदतवाढ

**महाराष्ट्र शासन**
वित्त विभाग
सुधारित शासन निर्णय
शासन निर्णय क्रमांक-मुवक-१५०७/प्रक्र.१३/कराधान-१
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२, दिनांक २० मार्च २००७.

**वाचा**:-१) शासन निर्णय क्रमांक-विकअ-११.००/प्रक्र.१५०(अ)/कराधान-१
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक २१ मे २००५.
२) शासन निर्णय क्रमांक-विकअ-११.००/प्रक्र.१५०(अ)/कराधान-१
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक १६ ऑक्टोबर २००६

**प्रस्तावना:-**

मुंबई विक्रीकर अधिनियम, १९५९ अन्वये, व्हिडीओ फिल्म तसेच चित्रपट फिल्मवरील कॉपीराईटच्या विक्रीवरील विक्रीकर, त्यानुषंगाने येणारे व्याज आणि शास्ती या संबंधीची प्रशासकीय सवलत शासनाने दिनांक २१ मे २००५ च्या शासन निर्णयाद्वारे दिनांक १.४.२००० ते ३१.३.२००५ या कालावधीकरिता दिली होती. ही प्रशासकीय सवलत अनुज्ञेय असण्याकरिता "महाराष्ट्र मुल्यवर्धित कर अधिनियम - २००२ अन्वये नोंदणी दाखला घेण्यास पात्र असलेल्या व्यापा-याने, दिनांक ३०.९.२००५ पर्यंत नोंदणी दाखला घेणे आवश्यक आहे" अशी अट शासन निर्णयामध्ये घालण्यात आली. या शासन निर्णयासंबंधीची माहिती व्यापारी वर्गास उशिरा मिळाल्यामुळे शासन निर्णयातील अटीप्रमाणे दिनांक ३०.९.२००५ पर्यंत पुरेशा वेळेअभावी व्यापारी वर्गाकडून नोंदणी दाखल्यासाठी अर्ज दाखल होऊ शकले नाही. त्यामुळे नोंदणी दाखल्यासाठी अर्ज करण्यासाठीची मुदत वाढविण्याबाबत विनंती व्यापारी वर्गाकडून करण्यात आली होती. त्यानुसार दिनांक १६ ऑक्टोबर २००६ च्या शासन निर्णयाद्वारे ही मुदत दिनांक ३१.१०.२००५ पर्यंत वाढवून देण्यात आली. त्यानंतर आता पुन्हा बऱ्याच व्यापाऱ्यांना या निर्णयाची माहीती न मिळाल्याचे शासनाच्या लक्षात आणून देणारी निवेदने मिळाली आहेत. त्यामुळे हा कालावधी देखील पुरेसा नसल्याचे लक्षात आणून देऊन नोंदणी दाखला घेण्यासाठी अर्ज करण्याची मुदत वाढवून द्यावी अशी विनंती व्यापारी वर्गाकडून करण्यात आली आहे. व्यापारी वर्गाची ही विनंती लक्षात घेवून सदर प्रशासकीय सवलतीचे फायदे अशा प्रकरणामध्ये प्राप्त होण्यासाठी नोंदणी दाखला दिनांक ३१.१०.२००६ पर्यंत घेण्याची अट शिथील करण्याचा निर्णय शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार दिनांक १६ ऑक्टोबर २००६ च्या शासन निर्णयात खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

**शासन निर्णय:-**

व्हिडिओ फिल्म्स चित्रपटांसहित कॉपीराईट हस्तांतरणावरील मुंबई विक्रीकर अधिनियमाखालील १.४.२००० ते ३१.३.२००५ पर्यंतच्या कालावधीसाठी न भरलेल्या विक्रीकर, त्याअनुषंगाने देय होणारे व्याज आणि शास्ती यांची प्रशासकीय सवलत म्हणून वसूली केली जाणार नाही. मात्र ही सवलत अनुज्ञेय असण्यासाठी महाराष्ट्र मुल्यवर्धित कर अधिनियम, २००२ अन्वये जर व्यापारी नोंदणी दाखला घेण्यास पात्र असल्यास, सदर व्यापा-याने दिनांक ३१.१०.२००५ पर्यंत नोंदणी दाखला

घेण्याची जी अट शासन निर्णयामध्ये नमूद करण्यात आलेली ती शिथील करुन आता ती मुदत दिनांक ३०.४.२००७ पर्यंत वाढवून त्या मुदतीपर्यंत नोंदणी दाखला व्यापा-याने घेतला असल्यास, अशा व्यापा-यांना प्रशासकीय सवलतीचे फायदे मिळतील.

प्रशासकीय सवलत मंजूर करण्याचे अधिकार, मूळ शासन निर्णया प्रमाणेच विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना देण्यात येत असून, आवश्यकतेनुसार सदर अधिकार आयुक्तांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील अपर विक्रीकर आयुक्त, विक्रीकर सहआयुक्त, ज्येष्ठ विक्रीकर उपायुक्त, विक्रीकर उपायुक्त, सहाय्यक विक्रीकर आयुक्त, विक्रीकर अधिकारी यांना हे अधिकार प्रदान करण्याची परवानगी विक्रीकर आयुक्तांना देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णयाची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.Maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आली असून त्याचा संकेतांक 20070321124614001 असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( शशांक माथने )
**विशेष कार्य अधिकारी,**

**प्रत:-**

माहितीसाठी व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१) विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, विक्रीकर भवन, ८ वा मजला, माझगांव, मुंबई-४०००१०.( ४० प्रती)
२) महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३) महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४) संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
६) निवासी लेखा परीक्षक, मुंबई.
७) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.
८) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ग्रंथालय, ६ वा मजला, विधानभवन, मुंबई-३२.
९) निवड नस्ती, कराधान-१.